# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००० १**

क्र.सहा.आ/ए/०१६७३/ ओडी /परिरक्षण, दिनांक: २०/०१/२०२६

## स्थळ दरपत्रिका सूचना

'ए' विभागातील श्यामाप्रसाद मुखर्जी चौक येथील वाहतूक बेटामध्ये स्थित हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंती निमित्त येणा-या महत्वाच्या व्यक्ती आणि मुंबई शहर व महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यांमधुन मानवंदना देणेकरीता येणा-या लोकांना विविध सोयी-सुविधा जसे की, मंडपाची उभारणी, विद्युत रोषणाई, टेबल फॅन्स, सोफा, सिलबंद पाण्याच्या बाटल्या, ध्वनिक्षेपक आणि फुलांची सजावट इत्यादी कामे प्रस्ताविण्यात येत आहेत.

सदर कामे पूर्ण करणे करीता मा. उप आयुक्त (परिमंडळ – १) यांची मंजूरी प्राप्त झालेली असून 'ए' विभागातील श्यामाप्रसाद मुखर्जी चौक येथील वाहतूक बेटामध्ये स्थित हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंती निमित्त दिनांक २३.०१.२०२६ रोजीच्या पुर्वतयारीकरीता खालील तक्त्यात नमूद कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदांराकडून मोहोरबंद स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च वस्तु व सेवाकर सहित (रु. मध्ये) |
|---|---|---|
| १ | मंडपाची उभारणी, विद्युत रोषणाई, टेबल फॅन्स, सोफा, सिलबंद पाण्याच्या बाटल्या, ध्वनिक्षेपक पुरविणेबाबत (Erection of temporary mandap, halogen lights, tables fan, sofa set, drinking water bottles, tea & P.A. system etc) | २,५८,९५१/- |
| २ | श्यामाप्रसाद मुखर्जी चौक येथे विद्युत रोषणाई करणे बाबत (Illuminating the area of Shamaprasad Mukharji Chowk and traffic Island of Hinduruday Samrat Balasaheb Thackrey) | २,८०,०००/- |
| ३ | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळयाला फुलांची सजावट व पुष्पगुच्छ यांचा पुरवठा करणे बाबत(Garlanding and flower arrangements and supply of bouqets at Shamaprasad Mukharji Chowk traffic Island of Hinduruday samrat Balasaheb Thackrey) | १,९५,०००/- |

पात्रता व निकष:-

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.
२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे  सहा.आयुक्त विभाग यांचे  'ए' कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी स्थळदरपत्रिका भरण्याची कालावधी (दिनांक २०.०१.२०२६– सायं-०४:०० ते दिनांक २१.०१.२०२६ – सायं ४:०० पर्यंत व त्याच दिवशी, दिनांक २१.०१.२०२६ – सायं ४:३०  वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येतील.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग**